



**थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा..**
**त्यांच्या सम आपण व्हावे, हाच सापडे बोध खरा...**

## "वसुधैव कुटुम्बकम्" – कुटुंब कसे सुखी ठेवावे...?

# पारिवारिक (कुटुंब) व्यवसाय नियोजन लेख.

## दूरदर्शी राजा, महान लोक, महान संस्था आणि सध्याच्या यशस्वी गोष्टींच्या शिकवणींवर आधारित लेख

www.Dudhgaonkar.in/Family_Biz_Mgnt.pdf

**Dated:- 25 December 2025**

**या महान विचारांचे संकलक**

समीर गणेशराव दूधगांवकर. एम.एस.मेकॅनिकल इंजीनियर यु.एस.ए.

- **जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी** हा विचार आचरणात आणून अमेरिकेत 2003 मध्ये मिळालेली संशोधन शिष्यवृत्ती नाकारून जन्मभूमीच्या सेवेसाठी परत येणारे
- उपाध्यक्ष (2014-18) - महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स. 1927 साली स्थापित राज्य शिखर संस्था (व्यापार)
- **2002 पासून भगवत-गीता अभ्यासक. ईश्वर-केंद्रित कर्मयोगी**

# प्रस्तावना

"माझ्या जखमा लवकर भरत नाहीत" !!💔💔

"मुन्शीजी.. व्यावसायिक असावा तर डॅडी सारखा. ज्यांना रिकाम्या बाटलीच्या किंमतीची जाणीव आहे. परंतु त्यांच्या मुलाचे जीवन रिकाम्या बाटलीपेक्षा ही वाईट आहे याची कोणतीच जाणीव नाही.. चोवीस तास, व्यवसाय व्यवसाय व्यवसाय....! "

वडील-मुलाच्या अशा भांडणाला पडद्यावर संपूर्ण ताकदीने साकारून अमिताभ महानायक बनले.. चित्रपटातून लोक शिकतात आणि अशी जबरदस्त अदाकारी पाहून अमिताभने अनेक घरातील भांडण वाढविले आणि स्वतः पैशावाले बनले.

अनेक लोक स्वतःचाच स्वार्थ पाहतात; परंतु असे करतांना आयुष्यामध्ये मोठे ध्येय प्राप्त करू शकत नाहीत. असे का? कारण लोक महान **राजे सयाजीराव गायकवाड, हार्वर्ड विद्यापीठ, फोर्ब्स मॅगझीन, महान नेता अब्राहम लिंकन, श्रीमंत लोक** यांच्या शिकवणीवर आधारित विचार आचरणात आणत नाहीत.

काही लोकांच्या वागण्याकडे पाहून त्यांना विचारावेसे वाटते की, तुमच्या परिवाराचे 12 वाजवायचे आहेत का **तुम्हाला??** **नाही** ना..!! तर ही काही पाने वाचा.

परिवार चांगला राहावा ही इच्छा असणाऱ्यांनी काय करावे?? ह्याचे उत्तर ह्या लेखातून मिळते..
या अशांत वैश्वीक काळात परिवारांचे व्यवस्थापन कसे करावे या विषयीचे महान विचार!!

**आपलीच,**

**टीम समीर दुधगांवकर**

**www.Dudhgaonkar.in** **www.Shinde.World**

# पारिवारिक (कुटुंब) व्यवसाय नियोजन

पारिवारिक (कुटुंब) व्यवसाय नियोजन हा मागील 100 पेक्षा जास्त वर्षापासून काम केला गेलेला विषय आहे. हार्वर्ड विद्यापीठ अमेरिका, जपान मधील लोक गेल्या 400 वर्षापासून पारिवारिक व्यवसाय करतात आणि जगातल्या नावाजलेल्या लोकांनी **"परिवार कसे समृद्ध होतील?"** या विषयावर खूप संशोधन केले आहे. आपण गरिबीतून श्रीमंत झालेल्या भारताची चर्चा ऐकतोच. इमामी सारखा नियंत्रित व्यवसाय करणारा परिवार आणि आता अंबानीच्या कथेपासून काही विचार व्यक्त करण्याची आम्हाला परवानगी द्या.

*https://telecom.economictimes.indiatimes.com/news/breakingviews-ambani-succession-is-chance-to-divide-and-rule/78760131*

या लेखात खालील गोष्टी समजून घेण्यासारख्या आहेत.

"हे पाऊल रिलायन्सच्या वारसा हक्काच्या नियोजनाचा एक भाग आहे आणि यामध्ये कुटुंबातील वरिष्ठ सदस्य, तीन पाल्य आणि बाहेरील सदस्य जे मार्गदर्शक आणि सल्लागार म्हणून कार्य करतील," असे दोन पैकी एक व्यक्ती म्हणाला. रिलायन्सच्या निर्णय प्रक्रियेमध्ये पारिवारीक परिषद ही महत्वाची भूमिका बजावणार आहे. हा मंच प्रत्येक शाखेत सहमतीने प्रतिनिधित्व देईल आणि कुटुंबाशी किंवा त्या व्यवसायाशी संबंधित गंभीर निर्णय घेण्यात मदत करेल.

**1973 मध्ये धीरूभाईनी रिलायन्स ची स्थापना केली. आपल्या वडिलांच्या मृत्युनंतर अंबानी आपल्या भावासोबत असलेल्या शत्रूतेपासून बहुधा काही शिकत आहेत. अंबानी बंधूंनी आपल्या वडिलांच्या व्यवसायाचे विभाजन केले आहे.**

वरील बातमीनंतर आणखी एका लेखामध्ये विस्तृतपणे सांगितले आहे की कशाप्रकारे मोठे परिवार त्यांच्या व्यवसायाच्या वृद्धीसाठी योजना आखतात.

"साम्राज्याचे विभाजन झालेले असले तरी परिवाराच्या एकतेला मूल्य आहे. रिलायन्सचे 50.40% शेअर्स हे अंबानी, त्यांची आई, पत्नी, तीन अपत्ये आणि संबंधित संस्थांच्या मालकीची आहेत. मोठ्या उद्योग समूहाला विकसनशील बाजारामध्ये सहज प्रवेश मिळतील आणि कायदे तयार करणारे व नियामक यांना प्रभावित करता येते. रिलायंसने सर्व बाबी परिवारापर्यंतच सीमित ठेवल्याने त्यांना फायदा झाला आहे. रीफिनिटीव डाटा असे दर्शवितो की मागील 15 वर्षांमध्ये भारतीय कंपनीने त्यांच्या भागधारकांना निफ्टीपेक्षा तीनपट जास्त परतावा दिला आहे. अंबानीने कौटुंबिक सल्लागार मंडळ

स्थापन केले आहे. वर्तमानपत्रामध्ये आलेल्या या बातमीला रिलायंसने नाकारले आहे; परंतु हे एखाद्या विशिष्ट गोष्टीकडे जाण्यासाठी एक पाऊल आहे. एका परिवाराच्या मालकीचा व्यवसाय हा अनेक पिढ्या टिकतो.

**इटलीचा एंजली परिवार जो फिएट क्रायझलर कार कंपनी आणि जुव्हेनटस फुटबॉल क्लबचा मालक आहे, पारिवारिक परिषदेच्या माध्यमातून ते 100 परिवाराच्या हिताचे संरक्षण करतात. जर्मनीतील हजारो वर्ष जुनी मर्क कंपनी ही सुद्धा याप्रमाणेच कंपनी चालवते.** असे असले तरी मोठ्या प्रमाणात व्यावसायिक व्यवस्थापनाला शरण जातात.

मर्क, आणखी एक उदाहरण, संस्थापक परिवार, कार्यकारी व्यवस्थापनाचे पर्यवेक्षण करणाऱ्या भागीदारी मंडळाच्या माध्यमातून शतकानुशतके 19 अब्ज डॉलरच्या जर्मन औषध व रसायन कंपनीचे नियंत्रण करते.

हाँगकाँगच्या ली का – शिंगची रिलायंसशी तुलना करताना, ली का-शिंगने 2012 ला जाहीर केले की तो त्याच्या मोठ्या मुलाला कंपनी देणार आणि दुसऱ्याला पैसे. अंबानींची व्यवसायातील महत्वाकांक्षा लक्षात घेता असे सुचित करता येईल की ते मर्क किंवा एंजलीला टक्कर देण्यास माग-पुढे पाहणार नाहीत.

करोडो रुपयांची उलाढाल असलेले व्यवसाय उभारण्याचा अनुभव असलेल्या लोकांच्या जीवनातून अनेक गोष्टी शिकता येतील. त्यांच्याकडून आपण शिकू शकतो आणि आपला परिवार सुद्धा सर्व दृष्टीने प्रबळ बनवू शकतो.

**महाराज सयाजीराव गायकवाड, अब्राहम लिंकन, कौटुंबिक सल्लागार तसेच तज्ज्ञ लोक ज्यांनी फॉर्च्यून 500 फोर्ब्स सोबत अनेक व्यवहार व्यावसायिकपणे केले आहेत, त्यांच्याकडून शिकण्याइतके ते सुप्रसिद्ध नाहीत का? नक्कीच, तर विविध संकलित दृष्टीकोनातून आपण शिकूया.**

**आधुनिक जगातील सर्व समस्या आणि संकट सोडविण्यासाठी आपण पारिवारिक व्यवसाय नियोजन या विषयामध्ये नक्कीच प्राविण्य मिळविले पाहिजे.**

4 ऑगस्ट 2015 ला फोर्ब्स ने प्रकाशित केलेल्या लेखामध्ये कार्यरत कर्मचारी आणि त्यांच्या व्यवस्थापकाची भूमिका याविषयी खालील गोष्टी सांगितल्या आहेत.

- गॅलप डेटा 30% कर्मचारी ‘स्वेच्छेने कामात थोडी आवड दाखवतात’ हे दाखवते. टॉवर्स वॅटसन डेटा 35% कर्मचारी ‘कामात जास्त प्रमाणात आवड आहे’ दाखवतो आणि डेल कार्निज डेटा 29 % कर्मचारी ‘स्वेच्छेने कामात पूर्णपणे आवड आहे’ हे दर्शवितो.

**आणि हा काही लहान अभ्यास नाही**

- **गॅलप सर्वेक्षणामध्ये** 3,50,000 पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.
- **टॉवर्स वॅटसन सर्वे मध्ये** 32,000 पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

गमावलेल्या यु. एस. उत्पादकतेची वार्षिक किंमत ही ₹ 3,50,000 करोड पेक्षा जास्त आहे, असा अंदाज गॅलपने लावला आहे. ही एक प्रचंड संख्या आहे. हे दुर्धर/अस्वस्थ करणारे असले तरी ही समस्या किती मोठी आहे याची जाणीव करून देते. या रोगाच्या/समस्येच्या विच्छेदनासाठी उच्चस्तरीय घटक काय योगदान देतात.

या पाठाच्या शिर्षकाकडे वळताना, **"लोक मॅनेजरला सोडतात, कंपनीला नाही."** थोडक्यात, मॅनेजर आणि कर्मचाऱ्यांमधील संबंध हे महत्वाची भूमिका बजावतात. त्यानंतर इतर घटकांचा विचार करता येतो.

यामध्ये **वरिष्ठ नेतृत्वावर विश्वास, कंपनीचा अभिमान आणि एक स्थिर प्रवाही पुनर्रचना, टाळेबंद आणि "कमी पैशात जास्त काम"** चा दबाव यामुळे आलेली तीव्र अनिश्चितता.

परंतु येथे तथ्यांच्या संक्षिप्त कल्पना समूहांचा विषय नाही, ते संघटनेतील वातावरण आणि व्यक्तीपरत्वे विभिन्न आहे. कालक्रमानुसार एका उच्च दर्जाच्या कर्मचाऱ्याचे विच्छेदन हे व्यवस्थापनाचे अपयश आणि त्यांचे मुलभूत आव्हान या दोन्ही गोष्टी दर्शवितो. यामध्ये कोणताच प्रश्न नाही. आव्हान कोणते आहे तर जास्त संख्येत असणाऱ्या या समूहाची वैयक्तिक रुची किंवा आवड ही त्यांच्या कामामध्ये पाहिजे, त्यांच्या संघटनेविषयी चांगली भावना पाहिजे आणि त्यांना शक्य तेवढे उत्पादक म्हणून कार्य करणे.

## फोर्ब्स मध्ये प्रकाशित झालेला हा लेख श्री व्हिक्टर लीपमन यांनी लिहिला

**आहे. त्यांचा परिचय खालीलप्रमाणे आहे.**


फॉर्च्यून 500 व्यवस्थापनाचा जवळपास 25 वर्ष अनुभव, व्यवस्थापन या विषयामध्ये व्यावसायिक म्हणून दीर्घ काळापासून आवड, चांगली आणि वाईट दोन्ही, परिणामकारक आणि अपरिणामकारक, काय काम आणि काय नाही. माझे पुस्तक **'द टाइप बी मॅनेजर'** आणि माझे **ऑनलाईन UDEMY कोर्सेस 'मॅनेजर्स माईंड सेट'** आणि **'हाऊ टू मॅनेज डिफिकल्ट एम्प्लॉईज.'**

हार्वर्ड विद्यापीठातून पदवीधर, वेस्टर्न न्यू इंग्लंड युनिव्हर्सिटीतून एम.बी.ए., हार्वर्ड बिझनेस रिव्ह्यू मध्ये माझे कार्य दिसून आले आणि मी आज नियमितपणे मानसशास्त्रामध्ये योगदान देतो. हौलिंग वर्ल्ड मैनेजमेंट ट्रेनिंग एल एल सी संस्थापक आणि प्राचार्य.

***https://www.forbes.com/sites/victorlipman/2015/08/04/people-leave-managers-not-companies/#79449e6947a9***

पालक हे प्रामुख्याने मुलांचे व्यवस्थापक आहेत. वाईट पालक आणि वाईट कौटुंबिक वातावरणाचा परिणाम अत्यंत प्रचंड आहे. नुकसान आश्चर्यकारक असू शकते आणि महान परिवाराची उभारणी करण्याचे प्रयत्न हे प्रचंड आनंददायी आणि परिपूर्ण आहेत. त्याच्यातून सकारात्मक प्राप्ती होते. कारण कौटुंबिक वातावरणाचा परिणाम खूप आहे. हे लिहिण्यामागचा प्रयत्न समृद्ध कुटुंब उभारण्यासाठी प्रत्येक अर्थपूर्ण मापदंडावर मदतगार ठरतात. (मन,शरीर,आत्मा)

तुमच्या कुटुंबासाठी कोणी काहीही करणार नाही. तुम्हालाच तुमच्या कुटुंबासाठी पुढे यावे लागेल. पारिवारिक व्यवसाय व्यवस्थापनेच्या संकल्पनेचा प्रचार करतांना **उद्योग जगताने** एक मुद्दा शिकविला आहे तो म्हणजे मुलांना आपल्या पालकाचा व्यवसाय आवडत नाही याचे मुख्य कारण म्हणजे ते सातत्याने व्यवसायासंबंधीच्या तक्रारी/अडचणी दररोजच पालकांच्या तोंडून ऐकत असतात. यामुळेच मुले कौटुंबिक व्यवसायापासून दूर राहतात. कौटुंबिक व्यवसाय किती किफायतशीर आणि अर्थपूर्ण आहे, या गोष्टीला ते महत्व देत नाहीत.




**मुले जे शिकतात ते जगतात**

**डोरोथी लॉ नोल्टी - लेखक व कौटुंबिक सल्लागार**

## जर मुले या वातावरणात / यासोबत राहिली तर काय शिकतात :-

**टीका- ते धिक्कार / निर्भत्सना शिकतात**

**शत्रुत्व / संघर्ष- ते लढायला शिकतात**

**भीती- ते काळजीत पडणे / धास्तावने शिकतात**

**थट्टा / उपहास- ते भित्रेपणा / लाजाळू अनुभवायला शिकतात**

**मत्सर- ते असुया / मत्सर करायला शिकतात**

**लाज- ते अपराधीपणा अनुभवायला शिकतात**

**प्रोत्साहन / उत्तेजन- ते आत्मविश्वास शिकतात**

**सहनशीलता- ते संयम शिकतात**

**स्तुती- ते कौतुक / कृतज्ञता / रसग्रहण शिकतात**

मान्यता / एखादी गोष्ट स्वीकारण्याजोगी आहे असे दाखविणे- ते त्यांना स्वत:ला आवडायला लागतात
मान्यता- ते ध्येय असणे चांगले आहे हे शिकतात
देवाण-घेवाण- ते उदारपणा शिकतात

प्रामाणिकता- ते सत्यशीलता शिकतात
नि:पक्षपात- ते न्याय करायला शिकतात
दयाळूपणा / कदर / मनन- ते आदर करायला शिकतात
सुरक्षितता- ते स्वत:वर आणि आजुबाजूंच्यावर विश्वास करायला शिकतात
मित्रत्व- हे जग राहण्यासाठी सुंदर आहे हे शिकतात

**29 ऑगस्ट 2016 च्या सुमारास सर्वोच्च न्यायालय म्हणाले, आमच्या दिशानिर्देशकाविषयी तुम्ही विचार करतात, की सर्व काही पूर्ण झाले आहे? तुम्ही असा विचार करतात का आम्ही असा निकाल द्यावा की देशात भ्रष्टाचार नाही आणि भ्रष्टाचार हद्दपार झाला आहे का? आम्ही असा निकाल द्यावा की देशात 'राम राज्य' आले आहे? ते यासारखे असू शकत नाही. आपल्याला अनेक गोष्टी पाहिजेत परंतु आपण काही करू शकत नाही. अनेक गोष्टी करण्याची आमची क्षमता मर्यादित आहे. ही एक समस्या आहे.**

**सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने देशातील रस्ते आणि फुटपाथच्या अतिक्रमाणाबाबत दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करतांना हे म्हटले आहे. सुप्रीम कोर्टाने हे स्पष्टपणे सुचवले कि, आपल्या देशाला शहाणे, संवेदनशील, दृढ नेते किंवा नागरिकांची सर्व स्तरावर आवश्यकता आहे..**

**न्यायालयाचा निकाल किंवा कायदा आणून आपल्या देशातील सर्व समस्या सोडवता येणार नाहीत. सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी नेत्यांमध्ये आणि जनतेमध्ये योग्य प्रकारची माणसे पाहिजेत.**

## परिपूर्ण व्यक्ती/नेता कशा प्रकारे निवडायचा

**परिपूर्ण उमेदवाराच्या निवडीसाठी यूपीएससी वैज्ञानिक पद्धतीवर आधारित व्यक्तिमत्व परीक्षा घेते. उमेदवाराचे चरित्र आणि वर्तणूक तपासण्यासाठी ही पायरी महत्त्वाची आहे. उमेदवाराला नागरिकावर परिणाम करणाऱ्या नौकरीची जबाबदारी देण्यासाठी अशी परीक्षा महत्वाची आहे.**

**परत यावर विचार करतांना, देश कशा प्रकारे चालला पाहिजे याविषयी कायदा करणारे मार्गदर्शन करतात. व्यक्तिमत्व परीक्षेवर पुर्नविचार करतांना नेता कशा प्रकारे पाहिजे आणि त्याच्या कुटुंबाची**

**भूतकाळाची पार्श्वभूमी काय हे ओळखीच्या व्यक्तीकडून त्या नेत्यांची माहिती यशस्वीरित्या प्राप्त करता येते. हे नक्कीच केले पाहिजे, विशेषत: जेव्हा लोकशाहीमध्ये एखाद्या व्यक्तीला सर्वोच्च जबाबदारी मिळते ती म्हणजे सेवक नेता.**

**एक खरा नेता सेवा करतो, दुसऱ्यावर अधिकार गाजवत नाही. कुटुंबातील खरा नेता सेवा करतो, दुसऱ्यांवर अधिकार गाजवत नाही. कुटुंबातील पालकांविषयी हेच सांगता येईल.**

**एका महान पुस्तकाने शिकवले आहे की, "सत्तेची भूक ही अविकसित मनाचे निर्देश आहे."**

**सुप्रीम कोर्ट आम्हाला असे सांगतो की, आपण सर्व एकाच कुटुंबातील किंवा समाजातील सदस्यांसारखे आहोत, जर आपल्याला चांगले जग पाहिजे असेल तर आपण जीवनाच्या प्रत्येक टप्प्यांवर परिपूर्ण रीतीने वागले पाहिजे.**

**"चलता है भाई," अशा दृष्टीकोणाने आपल्या प्रगतीमध्ये अडथळा नाही आला पाहिजे. आपण आपल्या जीवनामध्ये कशाप्रकारे विचार आणि कृती केली पाहिजे? काही महान / सुप्रसिद्ध व्यक्तींनी सांगितलेली तत्वे आणि विचार शिकू, ज्यामुळे आपण राहत असलेल्या नकारात्मक जगामध्ये आपल्या कुटुंबाचे संरक्षण करू शकू आणि सर्व सुविधा पुरवू शकतो.**

## 1860 मध्ये काहीतरी शिकवले..


**लोकशाहीमध्ये सर्वात आदरणीय व्यक्तींमध्ये अब्राहम लिंकन आहेत. त्यांनी आपले जीवन जगण्यासाठी अनेक साध्या गोष्टी सांगितल्या आहेत. पारिवारिक व्यवस्थापन तत्वाच्या खोलात जाण्याच्या अगोदर, चला आपण अब्राहम लिंकन यांच्याकडून शिकूया.**

**अमेरिकेचे मार्केट 2008 मध्ये कोसळले चुकीच्या विचारांवर आधारित अमेरिकेचे मार्केट 2008 मध्ये कोसळले. चुकीच्या विचारांवर आधारित अर्थव्यवस्थेची उभारणी करताना त्यांनी नागरिकांना अमर्यादित कर्जाचे वितरण केले. कारण त्यांनी जास्तीत जास्त वस्तू विकत घ्याव्यात, जास्त पैसे खर्च करावेत आणि अर्थव्यवस्थेला मदत करावी.**

**वा! काय विचार आहेत. खर्च करण्याची सवय जी एक खोटी गोष्ट आहे ती देशाला मदत करते का?**

**कायदा तयार करणाऱ्यांनी त्यांच्याच सुप्रसिद्ध नेत्याकडून शिकले पाहिजे अशी इच्छा आहे. अब्राहम लिंकनने शिकवले आहे की, "उसन्या पैशावर आपण सुरक्षा स्थापित करू शकत नाहीत."**

# काही महत्वपूर्ण विचार




**अमेरिकेचे विजयी राष्ट्राध्यक्ष, ज्यांनी नागरी युद्धासारख्या घटनात्मक आणि नैतिक पेचप्रसंगी देशाचे नेतृत्व केले. गुलामगिरी संपवताना देश एकत्रित ठेवला आणि आर्थिक आधुनिकीकरणाला प्रोत्साहन दिले.**

- उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करून तुम्ही संकटातून बाहेर पडू शकत नाहीत.
- कर्जाच्या पैशावर तुम्ही सुरक्षित राहू शकत नाहीत.
- बचत न करता तुम्ही समृद्धी आणू शकत नाहीत.
- श्रीमंतांना लुटून तुम्ही गरिबांना मदत करू शकत नाहीत.
- वेतन देणाऱ्यांना खाली ओढून वेतन घेणाऱ्या लोकांना वर उचलू शकत नाहीत.
- श्रीमंतांचा नाश करून तुम्ही गरिबांना मदत करू शकत नाहीत.
- चिथावणीद्वारे वर्ग-द्वेष निर्माण करून तुम्ही बंधुभाव निर्माण करू शकत नाहीत.
- माणसांचे अधिकार आणि स्वातंत्र्य हिरावून तुम्ही चारित्र्यवान आणि धाडसी माणसे उभारू शकत नाहीत.
- हे लोक स्वतःसाठी काही करू शकतात परंतु ते काहीच करत नाहीत अश्या लोकांना तुम्ही कायम स्वरूपी मदत करू शकत नाहीत.

<u>अब्राहम लिंकन</u>

16 वे अध्यक्ष युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरीका

लिंकनच्या शिकवणीतून अमेरिकन लोक शिकले नाहीत, तुम्ही यापासून शिकलात का? सिद्ध झालेल्या मुद्द्यांपासून आपण शिकूया. आपल्या स्वतःच्या परिवाराच्या कल्याणासाठी, अशी विनंती करण्यात येते की या लेखातील काही साध्या गोष्टीच्या शिकवणीतून तुम्ही शिका.

# सयाजीराव गायकवाड

**काही लोक महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांना विसरले आहेत. कृपया त्यांच्या 7 पानांच्या विलक्षण उपक्रमावर ओझरती नजर टाकू या.. [www.UGTG.in/SG.pdf](www.UGTG.in/SG.pdf)**



सन 1933 मध्ये बडोदा संस्थानचे महान सयाजीराजे गायकवाड यांच्याद्वारे "मराठी राष्ट्र, सामर्थ्य आणि सत्ता फक्त 150 ते 200 वर्षच का सांभाळू शकले" याचे 3 कारण पुणे येथील एका सत्कारामध्ये शिकवले.

**त्यांनी म्हटले की, "अज्ञान, एकतेचा अभाव, खऱ्या धर्माला विसरणे" हे 3 कारण आहेत नुकसानीचे आणि त्यांनी ही गोष्ट सांगण्याच्या एक दिवस अगोदर शिकवले की चांगली सत्ता, सुराज्य यामध्ये तीन गोष्टी असतात.**

1. **कमीत कमी शासन**
2. **राजा आणि प्रजा यामध्ये कमीत कमी मध्यस्थ**
3. **कमीत कमी खर्चामध्ये तात्काळ न्याय मिळविण्याची क्षमता.**

आपण राहत असलेल्या या नकारात्मक जगामध्ये जर एखाद्याला विलक्षण पारिवारिक जीवन उभारण्याची तत्वे शिकायची असतील तर त्याने या महान राजाने शिकवलेले दोन विचार अंगिकारले पाहिजेत. चांगल्या परिणामासाठी त्याने एकतेचा अभाव आणि तात्काळ न्याय मिळविण्याची क्षमता याविषयी काळजी घेतली पाहीजे.

1990 मध्ये अनेक अब्जाधीशांना शिकवलेल्या गुरूंच्या मते पालक मुलांना मारत आहेत आणि मुलं पालकांना मारत आहेत याचे एकमेव कारण म्हणजे त्यांच्यामध्ये एकतेचा अभाव आहे.

यामुळे अशा महान व्यक्तींकडून शिकले पाहिजे. **एक प्रक्रिया म्हणून जगासमोर व्यक्त करण्याचा एक प्रयत्न आहे.**

- संघामध्ये ऐक्याची भावना वाढू शकते.

- दररोजचे जीवन जगताना आपण सहमतीने एक रेषा ओढली पाहिजे की ज्या रेषेला कोणीही ओलांडू शकणार नाही.

सर्वसमंतीने तयार केलेल्या नियमांचे पालन करणे हे महत्वाचे आहे. कारण सत्तेत असलेले लोक पक्षपात करून विश्वासघात करत आहेत असे कोणालाही वाटले नाही पाहिजे. या गोष्टीला कुटुंबातील निर्णय घेणाऱ्या कुटुंब प्रमुखांनी प्राधान्य दिले पाहिजे. यामुळे सदस्यांना न्याय मिळविण्यासाठी कुटुंबाच्या बाहेर जाण्याची गरज पडणार नाही.

जसे की आम्ही अगोदरही सांगितले आहे की अनेक परिवारांमध्ये मुलांना पालकांच्या व्यवसायामध्ये जाण्याची इच्छा नसते. कारण आपल्या व्यवसायाबद्दल पालक सातत्याने तक्रार करताना मुले ऐकत असतात. त्यामुळे अशा अडचणींच्या व्यवसायामध्ये जाण्यास मुलांची इच्छा नसते.

जर तुम्ही वाचक असाल तर राजावर विश्वास ठेऊ नका. तसेच अनेक महान राजे आणि राजकीय नेत्यांच्या चांगुलपणावर विश्वास ठेऊ नका. चला तर शिकूया **कशाप्रकारे एकाने एकविसाव्या शतकामध्ये एक महान पारिवारिक जीवन उभारले आहे.**

## 22 जुलै 2020 ला कोविड-19 (कोरोना) महामारीवर आलेल्या बातम्यांमधून आपण काहीतरी शिकणार आहोत.

सर्व जग पूर्णपणे बंद आहे. विमान, रेल्वे, कार, संपूर्ण उद्योग बंद असल्यामुळे वायूप्रदूषण कमी झाले आहे. आर्थिक दृष्टीने अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला आहे आणि भविष्य अनिश्चित झाले आहे. इथे एक परिवार आहे जो खुप श्रीमंत झाला आहे. ही मुकेश अंबानींची कथा नाही तर दुसऱ्या व्यक्तीची आहे ज्याची संपत्ती या काळात प्रचंड वाढली आहे.

**Aptech Computer Education Ltd** चे राकेशजी दूरदृष्टीचे होते. 1990च्या दशकामध्ये संगणकाची मुलभूत तत्वे शिकण्यासाठी अनेक युवकांनी या शैक्षणिक संस्थेचा उपयोग केला आणि बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये करिअर करण्यासाठी गेले.

महान गुरुंनी 1990 मध्ये शिकविले आहे की, मोठ-मोठ्या गप्पा कुणीही मारू शकतो; परंतु कामाशिवाय आणि त्यातून सकारात्मक परिणाम  दाखविल्याशिवाय फक्त मोठ्या गप्पांना काहीच किंमत नसते. राकेशजींना स्वतःसाठी संपत्ती निर्माण करताना सकारात्मक परिणामांची खात्री होती. समृद्ध होत असताना काय विचार करावा या विषयी त्यांनी काय शिकविले, चला आपण शिकूया...

राकेशजी म्हणतात की, **“जर आपल्याला श्रीमंत बनायचे असेल तर श्रीमंत लोक काय करतात ते आपण करूया. ते ज्या चांगल्या गोष्टींवर विश्वास ठेवतात, त्यावर विश्वास ठेऊया.”**

सर्वात हुशार समजले जाणारे गुंतवणूकदार श्री. राकेश झुनझुनवाला आपले रहस्य शिकवतात. आपण विचाराल की राकेशजींचे बोलणे का ऐकावे?

राकेशजींनी 1980 च्या दशकात फक्त 5000 रुपयापासून गुंतवणूक करायला सुरवात केली होती आणि आज त्यांच्या गुंतवणुकीने 10,000 करोड रुपयांचे मालक बनविले. तर माणूस हुशार आहे आणि लोकांनी कसा विचार करायला पाहिजे हे शिकवतात सुद्धा. ज्यांची गुंतवणूक कोरोनाच्या काळात सुद्धा वाढली.


**https://www.business-standard.com/article/markets/rakesh-jhunjhunwala-s-portfolio-outperforms-net-worth-over-rs-10-000-crore-120072100483_1.html**

**त्यांनी IIT, मुंबईच्या विद्यार्थ्यांना काही आवश्यक गोष्टी शिकविल्या :-**

1. **देवाच्या आशीर्वादावर ते विश्वास ठेवतात**
2. **व्यक्तीचे विचार हे त्याचे स्वतःचे पाहिजेत. दुसऱ्या व्यक्तीचे विचार आंधळेपणाने स्वीकारले नाही पाहिजेत.**
3. **अशा कंपनीची निवड करा जी चांगल्या पद्धतीने नियोजन करते आणि ज्या कंपनीचा सर्वात महत्वाचा मापदंड "सत्यता" हे आहे.**
4. **एकतेमध्ये शक्ती असते, या सिद्धांतावर काम करा.**

**याच गोष्टी सयाजी राजेंनी शिकविल्या होत्या. एकता, सत्य, सर्वांना न्याय मिळो असे वागावे.**

श्री राकेश झुनझुनवाला यांनी 2007 मध्ये IIT च्या विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण केले. यशस्वी लोकांची मानसिकता शिकण्यासाठी मी तुम्हाला काही स्लाईड्स दाखवत आहे. ₹ 10,000 करोड मिळविण्यासाठी आपल्याजवळ प्रचंड संपत्ती असण्याची आवश्यकता नाही. एका स्लाईड मध्ये राकेशजीनी ₹ 5000 ने सुरुवात केल्याचे दाखविले आहे. 😊





**(स्लाईड मधील शब्दांचे मराठीत भाषांतर)**

- ✓ **सुरवातीचे दिवस 1984 – 1989**
- ✓ **नम्र सुरुवात रु. 5000**
- ✓ **प्रारंभिक अडचणी**
- ✓ **स्वत:वर विश्वास**
- ✓ **स्वयंपर विश्वास**
- ✓ **प्रेरणा-सशक्त परिणाम**
- ✓ **विना त्रास प्राप्ती नाही**
- ✓ **प्रारंभिक व्यापार**
- ✓ **भांडवलाचे संरक्षण**
- ✓ **कर मान्यता आणि आवश्यकता.**

**दुसऱ्या स्लाईडमध्ये ते म्हणतात की स्वतंत्र विचार करणारे बना. दुसऱ्यांचे जीवन जगू नका. प्रत्येकाकडून शिका आणि तुमच्या जन्माचा उद्देश साध्य**

**करा.**




**(स्लाईड मधील शब्दांचे मराठीत भाषांतर)**

**राकेशजी एक**

- ✓ **स्वतंत्र व्यक्तीमत्व**
- ✓ **स्वतंत्र विचारवंत**
- ✓ **साधारणतेची उत्कटता, प्रमाणबद्ध धोका पत्करणे**
- ✓ **एक व्यापारी, एक गुंतवणूकदार, एक धाडसी भांडवलदार**
- ✓ **चुका करायला न घाबरणारे परंतु चूक केली तरी ती परवडणारी असावी असा विचार करणारे**
- ✓ **धर्म नाही, भावना नाही, वय नाही, नियम नाहीत; परंतु शेवटी कारणाला नेहमी महत्व देणारे.**
- ✓ **फक्त परिवर्तन हे कायम होत रहते, हे खुल्या मनाने व ह्रदयाने स्वीकारावे.**
- ✓ **शिकण्याची विनंती हा एक प्रवास आहे. निश्चित स्थळ किंवा ध्येय नाही.**
- ✓ **भावनेची जादू- शिस्तीसह कमी फायदा**
- ✓ **श्रद्धेतूनच संयम निर्माण होतो. लोभी बना परंतु जास्त काळ लोभी राहण्यासाठी वेळेची भूमिका समजावून घ्या.**
- ✓ **श्रद्धा से ही संयम निर्माण होता है. लोभ को अपनाओ परंतु जादा काळ  लोभ में रहने के लिए समय की भूमिका को समज लो.**
- ✓ **त्यांचे वचन त्यांची मर्यादा आहे. सर्वोच्च अखंडत्वामध्ये, त्यांच्या स्वातंत्र्यावर प्रेम करा.**




**(स्लाईड मधील शब्दांचे मराठीत भाषांतर)**

**आमची गुणविशेषता**

- ✓ **प्रार्थना**

-देव दयाळू आहे, वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद

- ✓ **ध्येय**

- अनेक लढाया हरल्यानंतरही युद्ध जिंकायचे आहे.

- ✓ **बोधवाक्य**

-जिथे ताठ मान करून चालू शकतो आणि मन भीतीमुक्त आहे

- ✓ **बोधचिन्ह RARE Enterprises**

-दुर्मिळ, उपक्रम, हरित आणि सांयुगिक

- ✓ **आधार रेखा**

-दिव्यदृष्टी, बुद्धी, अखंडत्व

**या बुद्धिमान माणसाने देव दयाळू आहे हे शोधले. परब्रह्माच्या संकल्पनेवर विवाद नको. वाचक हा मुख्य मुद्दा शिकतील ही आशा आहे.**

**आणखी एक स्लाईड जी अशा कंपन्यांबाबत बोलते की ज्यांच्याकडे चांगले व्यवस्थापन आहे ज्यामुळे एखाद्याची गुंतवणूक फायदेशीर होईल.**




**(स्लाईड मधील शब्दांचे मराठीत भाषांतर)**

- ✓ आमचा गुंतवणुकीबाबतचा दृष्टीकोन
- ✓ आकर्षक, बाह्य फायदा
- ✓ सहन करण्याजोगा स्पर्धात्मक फायदा
- ✓ क्षमतेतील वाढ + कार्यरत लाभ
- ✓ व्यवस्थापनाची गुणात्मकता + अखंडता
- ✓ समान गुणवत्तेवर EVA सकारात्मक असणे.
- ✓ मूल्यमापन: मूल्य - मूल्य विचलन.

# Management Quality + Integrity.




अशाप्रकारे आपण एक तत्व शिकलो आहोत ते म्हणजे गुणवत्ता आणि प्रामाणिकपणा हे प्रगतीसाठी आवश्यक आहेत. प्रामाणिकपणासोबत तत्त्वेही असावीत. परिपूर्ण आणि अखंड राहा. स्वार्थी बनू नका, सामान्यपणे चांगल्या गोष्टी करण्यासाठी समर्पित बना.

**चला या पद्धतीचा निष्कर्ष काढू या.**

- **ऐक्याने काम केले पाहिजे.**
- **सर्व संबंधित सदस्यांसोबत न्याय करणे.**

**बडोद्याचे महान राजे सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी 1933 मध्ये जे सांगितले तसेच RARE Enterprises चे संस्थापक राकेश झुनझुनवाला यांनी 2020 मध्ये शिकविले आहे. जर असे वागणे परिवारात झाले असेल तरच प्रत्येक परिवार प्रगती करेल.**

**हर्षला प्रताप कदम ( समीर यांच्या मामी) यांचे वडील....**

**पंढरपूरचे श्री विठ्ठल** भगवान हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत मानले जाते. हे मंदिर सन 1189 पासून आहे. **इसवी सन 1695 मध्ये पंढरपूरच्या विठ्ठल मूर्तीला स्वतःच्या गावात, घरी, शेतामध्ये ठेऊन 4 वर्ष 11 दिवस रक्षण करणारा पराक्रमी परिवार हा देगांवकर पाटील परिवार. या परिवाराच्या वंशज लेखकांच्या मामी आहेत.**





**अनिष औदुंबर घाटगे पाटील देगांवकर, घरामध्ये जमिनीच्या खाली ती जागा दाखवताना ज्या ठिकाणी विठ्ठल मूर्ती लपवून ठेवली होती.**

या परिवाराने फक्त एकाच वेळी नाही तर अनेक वेळा केले आहे. 325 वर्षांपूर्वी महाराष्ट्रासाठी खुप महत्वपूर्ण काम केले, तसेच गेल्या 50 वर्षांपासून कुटुंबाला एकत्रित ठेऊन संपन्न केले जाऊ शकते, हे ही दाखवून दिले. ते पण आजच्या अशा विनाशकारी जगामध्ये जेथे प्रत्येक क्षणी 'वाईट गोष्टी चांगल्या का आहेत' हे प्रत्येक माध्यमाद्वारे शिकविले जाते. **हर्षलाजींच्या वडिलांनी त्यांच्या कुटुंबाला तन-मन-धनाने एकत्रित ठेवले. सर्व शेतीचा उपयोग भाऊ-बहिण आणि त्यांच्या मुलांच्या भल्यासाठी केला.**



**त्यांनी आपल्या भावाला पहिल्यांदा बंगला बांधून दिला, भावाच्या मुलांना पहिले फायदा देत होते. मेहनत करून स्वत:च्या मर्जीने पिकाचे उत्पादन घेत होते आणि नेहमीच सत्य मार्गाने व मेहनतीने पैसे कमवीत राहिले.**



**उजवीकडे मामींच्या काकांचे घर आणि त्यानंतर बांधले गेले मामींच्या आई-वडिलांचे घर**

**जर कुटुंब प्रमुखाच्या हातात सत्ता असेल आणि तो त्याचा दुरुपयोग न करता सर्वांचा विकास करेल तर येणारी पिढी अशा कुटुंबप्रमुखाचा सन्मान करते आणि कुटुंब आनंदी राहते. भारताच्या इतिहासात हे केले गेले नाही आणि त्यामुळे असंतोष वाढत गेला, परिवार तुटत गेले आणि आजही तुटत आहेत.**


मुलांना आई-वडिलांच्या कामामध्ये मदत करावीशी वाटत नाही, माहित आहे का? कारण मुले ही आई-वडिलांच्या कामाविषयी त्यांच्याच तोंडून दररोज बरे-वाईट ऐकतात आणि त्यामुळे परिवाराच्या कामापासून ते दूर जातात.

असे होऊ नये यासाठी चला इमामीची कथा शिकुया... हे कसे करावे याचे शिक्षण आपल्याला इमामी कंपनीच्या नियोजनाच्या पद्धतीतून शिकायला मिळते. एक अशी कंपनी की ज्या कंपनीने अनेक गुंतवणूकदारांना खुप फायदा मिळवून दिला.

फोर्ब्सच्या अंकामध्ये पारिवारिक व्यवसाय व्यवस्थापन (नियोजन) चे उदाहरण दिले आहे.

एकता आणि प्रगती एकत्रितरीत्या विकसित करण्याच्या खालील पद्धती ही कथा शिकविते. ज्याप्रमाणे माणसाच्या अपेक्षेनुसार न्याय करण्याचे काम कुटुंब करते.

**वाचकांच्या फायद्यासाठी या विषयाच्या संबंधीत हार्वर्ड बिजनेस स्कूलच्या कोर्सचे स्क्रीनशॉट समाविष्ट केले आहेत. आमची प्रत्येक खेड्यामध्ये हे अमलात आणण्याची योजना आहे.**




फोर्ब्समध्ये विस्ताराने प्रकाशित झालेली खालील कथा आपल्याला हे शिकविते की कशाप्रकारे न्यायाची भावना टिकवून ठेवावी, कुटुंबातील सर्व सदस्यांच्या मर्यादेमध्ये तसेच सर्वांच्या प्रगतीसाठी एकात्मकतेने कसे काम करावे.

# भारतातील पारिवारिक व्यवसाय – फोर्ब्समधील एक यशस्वी कथा



समानता आणि प्रबळ पद्धती कशा पद्धतीने इमामी सदस्यांना एकत्र ठेवतात?

**(मराठीमध्ये भाषांतरित – संपूर्ण लेख)**

समानता आणि प्रबळ पद्धती यांच्यावर जोर देऊन इमामीने आपल्या परिवाराला एकत्र ठेवले आहे आणि व्यवसायामध्ये यश प्राप्त केले.

## एन. माधवन (फोर्ब्स इंडिया स्टाफ)..

दक्षिण कोलकाताच्या उच्चभ्रू वस्तीतील इमामी ग्रुपचे संस्थापक श्री राधेश्याम अग्रवाल यांच्या ‘अद्वेता’ निवासस्थानावर प्रत्येक दुसऱ्या शुक्रवारी एक सहविचार सभा ठेवण्यात येते. व्यवसायामध्ये असणाऱ्या कुटुंबातील सर्व सदस्यांना उपस्थित राहणे अनिवार्य असते. ज्या सदस्यांना बैठकीला उपस्थित राहणे शक्य असणार नाही त्यांनी अगोदरच तशी कल्पना देणे आवश्यक असते. बैठकीला उपस्थित असणाऱ्या सदस्यांना मोकळेपणाने बोलण्याचे आणि बैठकीत उपस्थित होणाऱ्या विषयांवर आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. कुटुंबाच्या बाहेरच्या व्यक्ती विशेषत: सल्लागार आणि कंपनीचे वरिष्ठ अधिकारी हे निमंत्रण असेल तरच बैठकीला उपस्थित राहू शकतात. समितीचे सचिव हे बैठकीची विषयपत्रिका तयार करून सदस्यांमध्ये अगोदरच वाटप करतात. ज्या सदस्यांवर विविध व्यवसायांची जबाबदारी असते त्यांनी बैठकीला तयारीने येण्याचे अपेक्षित असते. 72 वर्षीय श्री अग्रवाल म्हणतात की, “आम्ही प्रत्येक गोष्टींचे पुनर्मुल्यांकन करतो. त्यामध्ये व्यवसायाची कामगिरी, नवीन संकल्पना आणि बजेट यांचा समावेश असतो.” मागील बैठकीच्या इतिवृत्तानेच पुढील बैठकीची सुरुवात होते.

दुसऱ्या मजल्यावरील बैठक रुममध्ये बैठकीची सुरुवात सकाळी 10 वाजता होते. बैठक जवळपास तीन तास चालते. जर एखाद्या विषयावर सर्वसंमती झाली नाही तर त्यावर सखोल चर्चेची आज्ञा केली जाते. यामध्ये बाहेरील तज्ञांचा समावेश केला जातो. जेव्हा एखादा निर्णय घेतला जातो तेव्हा तो सर्वसंमतीनेच घेतला जातो. कुटुंबातील सदस्य

त्यांच्यातील वैचारिक मतभेद बाजूला ठेवतात आणि मनापासून निर्णयाला पाठींबा देतात. इमामीचे संस्थापक श्री राधेश्याम अग्रवाल म्हणतात की, “मतभेद हे डोक्यामध्ये घडू शकतात. हृदयामध्ये नाही.”

कुटुंबातील आपलेपणा हा अनेक कारणांनी विशेष आहे.  अग्रवाल आणि गोयंका हे शालेय मित्र असणे ही पण एक विशेष बाब आहे. त्यांनी चांगल्या नौकऱ्या सोडून देऊन 1974 मध्ये कॉस्मेटिक व्यवसाय सुरु केला.

त्यांचे व्यक्तिमत्त्व परस्पर विरोधी असले तरी त्यांची 62 वर्षे जुनी मैत्री आजही टिकून आहे. अग्रवाल हे बोलके आहेत तर गोयंका हे संकोची आहेत. अग्रवाल हे निर्णय घेताना आपल्या अंतर्ज्ञानाने आणि भावनेने (emotion and intuition) घेतात तर गोयंका हे तर्क आणि कारण ह्यावरून घेतात. ह्या लेखासाठीच्या चर्चेत गोयंकांनी स्वतःची मते ही ईमामी आणि कुटुंबापुरती मर्यादीत ठेवली, तर अग्रवाल ह्यांनी शांततापूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे तत्वज्ञान, वेद आणि मूल्य याविषयी पण मत मांडले.

**गोयंका म्हणतात, “आम्ही एकमेकांना पूरक अश्या विरोधी स्वभावाचे आहोत.. आणि असा विचार सर्वात सोपा मार्ग आहे आमची मैत्री कशी आहे हे सांगण्याकरिता...!!”**

अग्रवाल आपल्या मैत्रीविषयी तत्वज्ञानाचा आधार घेवून म्हणतात की, "जो देतो तो देव आणि जो राखून ठेवतो तो राक्षस". ते पुढे असे म्हणतात "आम्ही दोघांनीही देण्याचे निवडले आणि हाच आमच्या मैत्रीचा पाया आहे."

हा आपलेपणा दुसऱ्या पिढीमध्ये सुध्दा आला आहे. ज्यामध्ये सहा सदस्य असून ते पूर्णपणे व्यवसायामध्ये समाविष्ट आहेत. आर.के. अग्रवाल या विषयी बोलतात, "आपले दोघांचे वडील कशाप्रकारे काम करतात ते पाहतच ते मोठे झाले आणि त्यांच्यामध्ये सुध्दा तश्याच प्रकारचा आदर आणि एकमेकांविषयी प्रेम विकसीत झाले."  ते दोन वेगवेगळ्या कुटुंबातील नाही तर एकाच कुटुंबातील आहेत असे वातावरण आहे.

या गोष्टीचा सकारात्मक परिणाम व्यवसायावर देखील झाला आहे. ज्या क्षेत्रामध्ये मल्टीनॅशनल कंपन्याचे वर्चस्व आहे त्या क्षेत्रामध्ये ईमामीने फक्त जागाच मिळविली असे नाही तर बाजारामध्ये काही क्षेत्रात वर्चस्वपण मिळविले आहे.

४२ वर्षीय आदित्य अग्रवाल जे ईमामीचे अकार्यकारी संचालक आहेत, म्हणतात की “आमची पाच शक्तीशाली उत्पादने –

- **फेअर आणि हॅण्डसम (मार्केट हिस्सा ६५%)**
- **नवरत्न तेल (७७%)**
- **झेंडू बाम (५५%)**
- **बोरोप्लस (७७%)**
- **केशकिंग (३५%)**

यांनी आपआपल्या क्षेत्रामध्ये वर्चस्व निर्माण केले आहे.”

आदित्य अग्रवाल हे ईमामीचे Non-FMCG व्यवसायाचे व्यवस्थापन पाहतात.

ईमामी लिमिटेड ह्या FMCG कंपनीचा २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये कंपनीचा महसूल ₹ २६२४ कोटी होता. या वर्षामध्ये कंपनीचा नफा ₹ ३५९ कोटी आहे. कंपनीचा कार्यात्मक नफा हा २६% आहे तर समभागाचा परतावा हा अविश्वसनीय असा ४३% आहे.

ईमामीची उत्पादने ही संपूर्ण देशभरामध्ये ४० लाख वितरकांजवळ उपलब्ध आहेत आणि ईमामी आपल्या उत्पादनाच्या ब्रँडमध्ये नाविन्यता आणण्यासाठी प्रसिध्द आहे.

४४ वर्षीय मोहन गोयंका जे ईमामीचे संचालक आहेत, म्हणतात की चित्रपट कलाकारांना १९८० च्या दशकामध्ये उत्पादनाच्या प्रचारासाठी आम्हीच सर्वप्रथम आणले आहे. आम्हीच असे करण्याचे प्रणेते आहोत, त्यामध्ये अमिताभ बच्चन यांनी बोरोप्लसचा प्रचार केला तर शाहरुख खान यांनी फेअर आणि हॅण्डसमचा प्रचार केला ह्याचा उल्लेख गोयंका यांनी केला..

जागतिक बाजारपेठेमध्ये सत्तर देशांमध्ये ईमामीचे उत्पादने पोहोचले आहेत, त्यांचा आंतरराष्ट्रीय महसूल ₹ ३६५ कोटी आहे. ४४ वर्षीय प्रशांत गोयंका जे ईमामीचे संचालक आणि ईमामीचा आंतरराष्ट्रीय व्यापार सांभाळतात ते असे म्हणतात "मॅकेन्झी या कंपनीने तयार केलेले आंतरराष्ट्रीय व्यावसायिक धोरण राबविण्याच्या प्रक्रियेमध्ये आहोत आणि पुढील पाच वर्षांमध्ये भारताबाहेरील विक्रीच्या माध्यमातून  इमामीचा २५% महसूल प्राप्त होण्याचे अपेक्षित करीत आहोत."

**कंपनीचे खेळते भांडवल हे ₹ ८०० कोटी आहे, आणि ते ही केशकिंग हे उत्पादन मिळविण्यासाठी कंपनीने २०१५ सालामध्ये ₹ १७०० कोटी  खर्च केले आणि ₹ ३०० कोटी FMCG उत्पादनाचा कारखाना युनिट उभारणीसाठी खर्च केले तरीही कंपनीवरील कर्ज फक्त ₹ ३०० कोटी आहे. कंपनीचे CFO एन.एच. भन्साळी म्हणतात, “ मी आयुष्यभर इमामी सोबतच काम करत राहील.” त्यांनी 25 वर्षापूर्वी कंपनी जॉईन केली त्यावेळेस कंपनीचा महसूल फक्त ₹ १२ ( बारा ) कोटी होता.**

**याचाच अर्थ हे वेगळे सांगावयास नको की कंपनीमध्ये भागधारकांना चांगल्या प्रकारे परतावा दिला गेलाय. ज्यांनी १९७९-८० मध्ये ₹ १००० रुपयांचे  १०० शेअर्स विकत घेतले असतील त्यांची गुंतवणूक ३६ वर्षानंतर २०१६ मध्ये ₹ ८.८ कोटी झाली हे पाहिले आहे...!**

ईमामीचे यश हे कुटुंबातील सदस्यांमध्ये असणारा परस्पर आदर आणि आपलेपण यावर आहे; परंतु आर.के. अग्रवाल यांच्या मते ईमामीचे यश हे या व्यतिरिक्त कुटुंबासाठी तयार केलेले नियम आणि प्रबळ पध्दती किंवा रितीरिवाजावर सुध्दा अवलंबून आहे.

ईमामी कुटुंबासाठी दोन प्रकारांची नियमावली तयार केलेली आहे. त्यामध्ये कौटुंबिक नियमावली आणि व्यवसाय नियमावली आहे. "ही नियमावाली १५ वर्षापूर्वी कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत चर्चा करून तयार करण्यात आलेली आहे. त्याव्यतिरिक्त ज्या सदस्यांना वेगळे काही करावयाचे असेल त्यांनी त्यांच्या स्वतःच्या जबाबदारीवर करावे आणि त्यांनी तसे वेगळे काम करतांना त्यांच्याकडून काय अपेक्षा असतील हे ह्या नियमामधून त्या सदस्यांना कळते" असे अग्रवाल म्हणतात..

## कौटुंबिक नियमावली (काय करावे/काय नाही)

१. कुटुंबातील सदस्यांमध्ये डामडौल असू नये : - स्त्रियांनी दागिने आणि कपडे यावर पैसा उडवू नये आणि पुरुषाने कोणत्या प्रकारची कार घ्यावी याविषयी स्पष्ट संकेत दिलेले आहेत व हे कौटुंबिक व्यवसायात किती वर्ष काम केले आहे त्यावरून ठरविले जाते.

२. सदस्याने कुटुंबाचा अपमान किंवा अनादर होईल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य करू नये, कोणत्याही प्रकारचे बेकायदेशी, नाजायज (live-in सारखे) संबंध ठेवू नयेत.

३. कुटुंबातील एखाद्या सदस्याला वेगळा व्यवसाय करावयाचा असेल तर त्यासाठी परवानगी आहे (पण तसे आजवर कोणीही केलेले नाही.) .. त्यासाठी कुटुंबाकडून कशी मदत मिळेल हे देखील ठरलेले आहे - ₹ ५ कोटी मिळतील; परंतु कोणतीही आर्थिक गॅरन्टी कुटुंबाकडून मिळणार नाही.

४. कुटुंबामध्ये "समानता" हा खास शब्द असून तो वरील नियमांमध्ये पवित्र आहे. अग्रवाल आणि गोयंका कुटुंबाचे ईमामीमध्ये समान भाग आहेत. दोन्हीही कुटुंबाचे प्रत्येकी ४ सदस्य संचालक मंडळामध्ये आहेत. Non-FMCG व्यवसायात दोन्हीही कुटुंबातील प्रत्येकी एक सदस्य आहे. दोन्ही कुटुंबातील सदस्यांमध्ये ठराविक आणि समान पैशाचे वाटप केले जाते.

५. एखाद्या सदस्याने जर विशेष विनंती केली असेल तर ती मान्य केली जाते; परंतु इतर सदस्यांनाही त्याच वेळी त्या सदस्याइतका लाभ दिला जातो. प्रशांतच्या मते "मी आजपर्यंत कधीही पाहिले नाही की एखाद्या सदस्याला एखादी गोष्ट दिली जाते व इतरांना वंचित ठेवले जाते. त्यामुळे कोणाच्याही मनामध्ये वाईट भावना येत नाही". गोयंकांच्या मते "समानता ही आमच्या एकात्मतेचा कणा आहे."

६. कुटुंबातील सदस्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संवाद व्हावा, यावरही नियमावलीत जोर देण्यात आला आहे. दर दुसऱ्या शुक्रवारी होणाऱ्या बैठकीव्यतिरिक्त कुटुंबातील दुसऱ्या पिढीतील सदस्य हे दररोज दुपारच्या जेवणाच्या वेळी भेटतात.

७. कुटुंबातील सदस्यांच्या सुट्ट्या सुध्दा निश्चित केलेल्या असतात. उन्हाळी सुट्टीसाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीतील सदस्य हे बाहेर देशात जातात तर दुर्गा पुजेच्या सुट्टीच्या काळात कुटुंबातील जवळपास सर्व ५० सदस्य भारतातील कोणत्याही एका पर्यटन स्थळाला भेट देतात.

**रिचा अग्रवाल यांच्या मते, "दोन आठवडे हे कुटुंबातील सदस्यांमध्ये आपलेपणा निर्माण करण्यासाठी पुरेसे आहेत."** स्त्रिया आणि मुलांसाठी सुध्दा हा वेळ आपलेपणा वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरत आहे. रिचा अग्रवाल या 'ईमामी चिसेल आर्ट' ह्या परिवाराच्या आर्ट क्षेत्राशी संबंधीत कामाचे व्यवस्थापन पाहतात. ह्या कामात दोन मोठ्या आर्ट gallery जागेचे काम बघितले जाते आणि समकालीन कला आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न असतो....

## व्यावसायिक (governance) नियम:-

व्यावसायिक (governance) नियमामध्ये कुटुंबातील सदस्यांनी अल्कोहोल, तंबाखू आणि मांसाहारी पदार्थाच्या व्यवसायामध्ये उतरू नये असा नियम आहे. हे नियम अग्रवाल आणि गोयंका सुरुवातीपासून जे व्यायसायिक तत्वज्ञान जपत आले आहेत त्यावर आधारले आहेत..

भन्साळी म्हणतात की, "ग्राहकांना चांगले उत्पादन चांगल्या पॅकेजमध्ये परवडणाऱ्या किंमतीमध्ये द्यावे, हा आमच्या व्यवसायाचा अतिशय महत्त्वाचा नियम आहे.”

इतर नियमांमध्ये काटेकोर आर्थिक व्यवस्थापन, भागधारकासोबत उच्च दर्जाची पारदर्शकता आणि सर्व कबूल केलेल्या गोष्टी केल्या जातील हे बघितल्या जाते."

अग्रवाल यांच्या मते,"कुटुंबाची सदिच्छा आणि कंपनीचे ब्रँड मूल्य यावर कोणतीही तडजोड केली जात नाही."

कुटुंबातील सदस्य हे कंपनी चालविण्यासाठी सक्षम असले तरी ते बाहेरील तज्ञांचा सल्ला घेण्यासाठी कोणताही कमीपणा बाळगत नाहीत. अनेक Non-FMCG व्यवसाय हे व्यावसायिक नौकरदार लोकांकडून चालविले जातात. ईमामीमध्ये सुध्दा अनेक विभाग प्रमुख व्यावसायिक नौकरदार आहेत.

आर.के. अग्रवाल सांगतात, “कुटुंबातील त्या व्यवसायातील व्यक्ती हे फक्त कामकाज वर-वर बघतात किंवा देखरेख ठेवतात आणि व्यावसायिक नौकरदार लोकांना काम करण्याची मोकळीक दिली जाते”. याद्वारे दोन गोष्टी साध्य होतात. एक असे की व्यवसाय कुटुंबाद्वारे चालविला जातो आणि दोन व्यावसायिक तज्ञांद्वारे कंपनी चालविली जाते.”

ते मॅकेन्झीसारख्या कंपनीचा सल्ला देखील घेतात. त्यामध्ये विक्रेत्यांची कार्यक्षमता वाढवणे, उत्पादनाच्या किंमती कमी करणे, नफा वाढविणे आणि आंतरराष्ट्रीय व्यवसाय वाढविणे यांचा समावेश होतो.

ईमामीद्वारे दरवर्षी ४०% लाभांश वाटप केला जातो. कुटुंबांचा कंपनीमध्ये ७०% हिस्सा आहे. त्या व्यतिरिक्त ईमामी दरवर्षी आकर्षक Non-FMCG व्यवसायामध्ये पैसा गुंतविते.

४१ वर्षीय हर्षवर्धन अग्रवाल, जे अग्रवाल यांचे सर्वात लहान अपत्य आहेत आणि जे ईमामीचे संचालक आहेत यांच्या मते "Non-FMCG" व्यवसायामध्ये पैसा गुंतविणे हे कुंटुंबाचे धोरण आहे. ज्याद्वारे शासनाचे बदलणारे धोरण आणि जागतिक प्रभाव यांच्यापासून संरक्षण होते."

**असे करण्यामागे अजून काही कारणे देखील आहेत...**

अग्रवाल यांची मुलगी व कंपनीची पूर्णपणे संचालक प्रिती यांच्या मते, "आम्ही असे उद्यमी लोकं आहोत ज्यांची महत्वकांक्षा सदृढ आहे. अनेक व्यवसाय आम्हाला आव्हान देतात आणि आम्हाला अशा आव्हानात्मक गोष्टींवर विजय मिळवायला आवडते."

**इथेही एक सोनेरी नियम आहे.** ४३ वर्षीय मनिष गोयंकांच्या मते, "आम्ही एखाद्या व्यवसायामध्ये महत्त्वाचे स्थान मिळविले पाहिजे, नाही तर तो व्यवसाय बंद करायला आम्ही कचरत नाहीत."

**उदा. मागील काही वर्षांत खालील उद्योग बंद करण्यात आलेले आहेत-**

- **Filament Yarn Business,**
- **Ready to eat food business,**
- **Furnace operations,**
- **Photo paper बनवणे आणि**
- **नुकताच sanitary napkins चा व्यवसाय..!!**

ह्याच विचारधारेप्रमाणे एखाद्या व्यवसायामध्ये फायदा असेल तर ईमामी तो व्यवसाय वाढविण्यास कचरतही नाही...

- ईमामीचा News Print व्यवसाय हा देशामध्ये सर्वात मोठा आहे
- Card Board Manufacturing Business मध्ये ईमामी एक मोठा हिस्सेदार बनत चालली आहे
- आंध्रप्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये खाण व्यवसायामध्ये या कंपनीने गेल्या तीन वर्षामध्ये ५० लाख टनावरून २ कोटी एवढी क्षमता वाढविली आहे
- खाद्य तेलामध्ये या कंपनीचा अदानी नंतर दुसरा क्रमांक लागतो. ५ हजार टन क्षमतेचा रिफायनरी प्लांट हल्दीया या ठिकाणी उभारला आहे
- Ball Point Tip व्यवसायामध्ये मध्ये ही कंपनी जगात ४ थ्या क्रमांकाची आहे
- Bio-Diesel मध्ये कंपनी देशामध्ये अग्रगन्य आहे
- तसेच सोलार, रिटेल, बांधकाम, हॉस्पीटल, आर्ट या क्षेत्रामध्ये सुध्दा कंपनीने आपले व्यवसाय सुरु केले आहेत.

व्यवसायाची ही लांब यादी असे दर्शविते की ईमामीला आपल्या व्यवसायामध्ये विविधता आणायची इच्छा आहे.

कारण काय? तर तिसऱ्या पिढीसाठी त्यांना संधी उपलब्ध करून द्यावयाची आहे. तिसऱ्या पिढीमध्ये नऊ सदस्य आहेत. ते येत्या काही वर्षांमध्ये कंपनीमध्ये समाविष्ट होतील. ते एकमेकांसोबत कसे काम करतील, हा विचार वरिष्ठांच्या कायम डोक्यात असतो.

गोयंकांच्या मते, "तिसऱ्या पिढीमध्ये आपलेपणाची भावना आहे जे कि आम्हाला दिसून येते... मला असा विश्वास आहे की, ते त्यांचे वडील आणि काका यांच्यासारखंच प्रेरणेने आणि त्याच भावनेने काम करतील."

श्री. अग्रवाल ह्याबद्दल बोलताना आता तत्वज्ञानाकडे वळले आहेत. त्यांच्या मते जीवनामध्ये तीन गोष्टी आहेत. **"जे तुम्ही पाहता, जे अनपेक्षित आणि अकस्मितरित्या आहे.** हे अकस्मितरित्या या प्रवर्गामध्ये समाविष्ट आहे. आम्ही त्यांच्यासाठी आपलेपणा निर्माण होण्यासाठी उत्तम वातावरण तयार केले आहे. बाकी आम्ही देवावर सोडले आहे."

**ही कथा ३१ मार्च २०१७ च्या फोर्ब्स इंडिया या अंकात लिहिली गेली.**

फोर्ब्स लेखाची समाप्ती.

© अधिकार 2016, www.Forbesindia.com

मुळ फोर्ब्स लेखची लिंक:

https://www.forbesindia.com/article/indias-family-businesses/how-equality-and-strong-processes-keep-the-emami-promoters-united/46439/1

# इमामी बाबतच्या लेखात सुचवलेली कार्यपद्धती -

पारिवारिक व्यवसाय नियोजन (Family Business Management) हा मागील १०० पेक्षा जास्ती वर्षांपासून काम केला गेलेला विषय आहे. हार्वर्ड विद्यापीठ अमेरिका, जपान मधील ४०० वर्षे परिवारात असलेले व्यवसाय, आणि जगातल्या नावाजलेल्या लोकांनी परिवार कसे समृद्ध होतील ह्याबद्दल खूप संशोधन केले आहे.

करोडोंचे व्यवहार करणाऱ्यांकडून शिकण्यासारख्या खालील गोष्टी, जेणेकरून परिवार सगळ्या बाबतीत सुदृढ होतील… खालील लेखातून शिकण्यासारख्या महत्वाच्या अश्या खूप गोष्टी आहेत..

**ज्यांनी १९७९-८० मध्ये ₹ १००० रुपयांचे इमामी शेअर्स विकत घेतले त्यांची गुंतवणूक ३६ वर्षानंतर, २०१६ मध्ये ₹ ८.८ कोटी रु. झाली होती..**

प्रामाणिकपणे मेहनत करून लोकांचा फायदा करून देणाऱ्या ह्या परिवाराकडून शिकण्यासारखे खूप काही आहे. कसे असावे सर्वोत्तम परिवार समृद्धी नियोजन? असे काय केले आहे या परिवाराने? वाचा...

- महिन्यातून दोनदा सर्व कारभारी लोकांच्या मीटिंगचे नियोजन असावे
- कागदपत्रांचे नियोजन करण्यासाठी एका व्यक्तीला नौकरीवर ठेवावे
- कुटुंबासाठी दोन प्रकारांची नियमावली तयार केलेली आहे. त्यामध्ये कौटुंबिक नियमावली आणि व्यावसायिक नियमावली असे दोन भाग आहेत
- कुटुंबामध्ये समानता हा खास शब्द असून तो वरील सर्व नियमांमध्ये पवित्र आहे. "समानता हा एकात्मतेचा दुवा आहे."
- व्यावसायिक नियमांमध्ये कुटुंबातील सदस्यांना अल्कोहोल, तंबाखू आणि मांसाहारी पदार्थांच्या व्यवसायामध्ये उतरू नये, असा नियम आहे
- इतर नियमांमध्ये काटेकोर आर्थिक व्यवस्थापन, भागधारकांसोबत उच्च दर्जाची पारदर्शकता आणि मान्य केलेल्या सर्व गोष्टी केला जातील हे पाहिले जाते
- कुटुंबाची समृद्धी या सदिच्छेबाबत आणि कंपनीच्या उत्पादनाचा दर्जा यावर कोणतीही तडजोड केली जात नाही
- एखाद्या व्यवसायामध्ये फायदा असेल तर इमामी त्या व्यवसायाचा विस्तार करण्यास मागे-पुढे पाहत नाही
- कंपनीमध्ये भागधारकांना चांगल्या प्रकारे परतावा दिला जातो

उस्मानाबादचा एक परिवार ज्यांचा एक वंशज IIT मुंबई वरून शिकून एक चांगला उद्योजक बनला आहे, त्या परिवाराच्या पूर्वजांची एक गोष्ट त्याने लेखकाला सांगितली. त्याच्या आजोबांनी प्रत्येक मुलाला एक-एक कार्यक्षेत्र दिले होते. एक मुलगा शेती करेल, दुसरा शासकीय स्तरावरील काम करेल, तिसरा राजकीय काम पाहिल तर चौथा मुलगा सर्वांच्या परिवाराकडे लक्ष ठेवेल. जोपर्यंत असे चालले होते, परिवार व्यवस्थित चालत होता; नंतर तो असा राहिला नाही. त्याचा परिणाम म्हणून

परिवाराची ताकत आता कमी झाली आहे. त्यामुळे पारिवारिक कामाचे नियोजन परिवाराची ताकत कायम ठेवण्यासाठी एक महत्वपूर्ण बाब आहे.

आपण आज काल हे कर ते कर म्हणून आपल्या मुलांच्या मागे लागलेलो असतो. लेखकाच्या अनुभवानुसार या जगात फक्त पाच प्रकारचे लोक आहेत.

1. **सरकारी किंवा खाजगी नौकरी करणारे**
2. **छोटा बिजनेस करणारे**
3. **खुप मोठा बिजनेस करणारे**
4. **गुंतवणूक करून त्याद्वारे पैसा कमावणारे**
5. **समाजसेवक, राजकारणी. [जे वरील चारही प्रकारचे लोक कसे जगतील हे ठरवतात 😊 ]**

ही गोष्ट आपल्या आणि आपल्या मुलांच्या जितकी लवकर लक्षात येईल तितकं त्यांच्यासाठी आणि आपल्यासाठी चांगले आहे. जर आपण त्यांना या पाच पैकी एक प्रकार अगोदर निवडायला सांगितले तर त्यांचा वेळ योग्य ठिकाणी खर्च होईल आणि आयुष्य चुकीच्या गोष्टींच्या मागे खर्च झाले ही गोष्ट त्यांना परेशान करणार नाही. ज्याला जो प्रकार आवडेल त्याने तो निवडावा आणि आयुष्यात पुढे जात राहावे.

# टीम समीर ने संकलित केलेल्या लेखाचा निष्कर्ष:

- ईमामीची ही कार्यपद्धती हे व्यवसाय आणि परिवाराची समृद्धी याचे नियोजन कसे करावे याचे एक उत्तम उदाहरण आहे.
- व्यवसायामध्ये व्यवस्थापन कसे असावे, एखाद्या सदस्याला जी मदत केली जाते तीच इतर सदस्यांनादेखील केली जाते यातून समानतेची भावना आणि प्रत्येकाचा आदर राखण्याची पद्धत दिसून येते.
- एखादा व्यवसाय जर दीर्घ काळासाठी यशस्वीपणे चालवायचा असेल तर सर्व सदस्यांनी कसे वागावे तसेच सर्व सदस्यांना कसे वागवावे याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे ईमामी होय.
- सध्या व्यवसाय करत असताना आपण आपल्या पुढच्या पिढीनेदेखील तो व्यवसाय उत्तमरीत्या सांभाळावा यासाठी सुरवातीपासूनच पाऊले उचलायला हवीत जेणेकरून पुढच्या पिढीमध्ये मतभेद होणार नाहीत.

**पूर्ण लेख वाचून निर्णय प्रक्रियेच्या, वर्तणुकीच्या पद्धती शिकता येतील.**

आजकालच्या अवघड जागतिक परिस्थितीमध्ये आपल्या स्वतःच्या परिवाराला मोठे करण्यासाठी असलेला संपूर्ण लेख नक्की वाचा आणि अमलात आणा. **स्वतःच्या परिवाराच्या सदस्यांना पुढे आणण्यात कसली लाज??** लोक काय म्हणतील याचा विचार नका करू..

सामाजिक कार्ये परिवार म्हणून करायची असतात, तिथे समस्या नसावी. कारण कुणालाच नियोजित पध्दतीमागचा उद्देश महत्वपूर्ण वाटत नाही किंवा योग्य पद्धत सुद्धा लोक विसरून गेले आहेत. जसे सयाजीराजे शिकवून गेले किंवा त्याआधी अब्राहम लिंकन शिकवून गेले किंवा पंढरपुरचे देगांवकर पाटील यांनी सुद्धा शिकविले की अशा वर्तणुकीमध्येच जगण्याचा आनंद आहे. हेच लोक विसरून गेले आहेत; पण ज्यांनी-ज्यांनी या गोष्टींकडे लक्ष दिले ते परिवार समाजात सन्मानाचे स्थान मिळवू शकले. ते आज आनंदी आहेत!!

नियोजन करा आणि सर्वांना पुढे आणण्यात खुप आनंद असतो, तो अनुभवा. ☺

**“वसुधैव कुटुम्बकम्” हे घडवून आणावेच लागेल.**

# संपूर्ण लेखाचा सारांश

पारिवारिक व्यवसाय नियोजन या विषयावर गेल्या १०० वर्षांपासून काम चालू आहे. हार्वर्ड विद्यापीठ अमेरिका, जपान मधील लोक गेल्या ४०० वर्षांपासून पारिवारिक व्यवसाय करतात आणि काही प्रसिद्ध व्यक्तींनी परिवाराची प्रगती या विषयावर खुप संशोधन केले आहे. ज्या लोकांना करोडोंची उलाढाल असलेले व्यवसाय उभारण्याचा प्रत्यक्षात अनुभव आहे अशा लोकांकडून (महाराज सयाजीराव गायकवाड, अब्राहम लिंकन, परिवारीक समुपदेशक, फॉर्च्युन 500 MNC सोबत काम करत असलेले व्यावसायिक तज्ञ) खालील गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

- ✓ जर एखाद्याला महान संघटना किंवा परिवार उभारायचा असेल तर सर्वांसाठी एकता आणि न्याय हे सर्वश्रेष्ठ आहेत.
- ✓ इमामीच्या अभिजात व्यवस्थापकीय पद्धती आपल्याला एक उत्तम उदाहरण शिकवतात की कशाप्रकारे स्वतःच्या व्यवसायाची वाढ आणि परिवाराची प्रगती करावी.
- ✓ कशाप्रकारे व्यवसायाचे नियोजन करावे, एखाद्या सदस्याला सहकार्य केल्यानंतर इतर सदस्यांनाही सहकार्य करावे. यावरून हे सिद्ध होते की कुटुंबामध्ये समानतेची भावना आहे तसेच सर्वांचा सन्मान या गोष्टीला नेहमीच प्राधान्य दिले जाते.
- ✓ **जर कोणताही व्यवसाय दीर्घकाळ टिकवायचा असेल तर इमामीचा लेख हा सर्वांनी कसे वागावे तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांना कशी वागणूक दिली जावी याचे उत्तम उदाहरण आहे.**
- ✓ व्यवसाय करत असताना सुरुवातीपासूनच आपली पुढील पिढी हा व्यवसाय सांभाळू शकतील या दृष्टीने पाऊले टाकावीत. त्यामुळे पुढील पिढीमध्ये कोणत्याही प्रकारचे मतभे राहणार नाहीत. जर तुम्ही तुमच्या स्वतःच्या पिढीला मदत करत आहात तर लाज बाळगू नका किंवा जनतेच्या प्रतिकूल प्रतिक्रियेची भीती बाळगू नका. अनेक लोक प्रामाणिकपणा, सच्चेपणा आणि अखंडत्व विसरतात, त्यांच्या निरर्थक चर्चेची चिंता का करता? महान व्यक्तींनी जे शिकविले ते करा आणि आनंदी कुटुंब व आनंदी जगाची उभारणी करायला निघा.
- ✓ **"वसुधैव कुटुम्बकम" पृथ्वी ही माझे कुटुंब आहे. विस्तारनारा परिवार कशाप्रकारे हाताळायचा हे या लेखामध्ये सांगितले आहे.**

येथे सांगितलेल्या सर्व गोष्टी या निर्दोष माहितीवर आधारित आहेत. त्या शिकण्यासाठी तुम्हाला खुप शुभेच्छा. एक आनंदी, प्रेमळ आणि प्रगतशील पारिवारिक शाखा उभारण्यात तुम्ही यशस्वी होऊ शकता.

लेख समाप्त.

**महान ध्येयाच्या प्राप्ती करण्यासाठी टीम समीरला संपर्क करा**

“लोकांचा देवावर असलेला विश्वास उडवायचा आहे"

**विश्वाच्या या सर्वात मोठ्या षड्यंत्रामध्ये**

**न फसणारा युवक म्हणजे समीर ☺**

**ॐ दत्तगुरवे नमः !**

**ॐ पार्वती महादेवाय नमः !**

**ॐ लक्ष्मी नारायणाय नमः !**

**ॐ सरस्वतये ब्रम्हदेवाय नमः !**

**जय सियाराम !**

**जय श्रीकृष्ण !**